International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 12 No.4 Mar-Apr 2025

# रॉय किणीकर यांच्या कथेतील सामाजिकता

**डॉ. राजश्री पराग देशपांडे**
सहाय्यक प्राध्यापक मराठी विभाग फर्ग्युसन महाविद्यालय पुणे.
**Corresponding Author: डॉ. राजश्री पराग देशपांडे**
**DOI- 10.5281/zenodo.17008019**

**सारांश**

रॉय किणीकर यांचा आंधळे रंग पांगळ्या रेषा हा कथासंग्रह सामाजिक जाणीव आणि मूल्यसंघर्ष अधोरेखित करणारा ठरतो. या संग्रहातील कथा मानवी जीवनातील गुंतागुंती, राजकीय-सामाजिक प्रश्न, सांस्कृतिक संदर्भ आणि व्यक्तिरेखांच्या मानसिक प्रवृत्ती यांचे सूक्ष्म चित्रण करतात. कथानक रचनेत घटनांची गुंफण, व्यक्तिरेखांची हालचाल, भाषाशैली, निवेदन आणि वातावरणनिर्मिती यामुळे कथा प्रभावी ठरतात. विशेषतः आंधळे डोळे आणि मनुस्मृती यांसारख्या कथांमधून ग्रामजीवन, स्त्री-पुरुष संबंध, स्त्रीजीवनातील संघर्ष व शोषण, तसेच सामाजिक विळख्यातून बाहेर पडण्याचा प्रयत्न यांचा भावनिक व कलात्मक आविष्कार घडतो. किणीकर यांच्या कथालेखनात सामाजिकतेबरोबरच मानवी मूल्यांची जाणीव, कार्यकारणभाव, जीवनसंघर्ष, तसेच स्त्रीविषयक सकारात्मक दृष्टिकोन प्रकर्षाने दिसून येतो. त्यामुळे त्यांच्या कथा केवळ मनोरंजनात्मक न राहता सामाजिक व सांस्कृतिक परिवर्तनाचे दस्तावेज ठरतात.

**मुख्यशब्द**-रॉय किणीकर,आंधळे रंग पांगळ्या रेषा,सामाजिक जाणीव,मूल्यसंघर्ष,कथानक रचना,ग्रामजीवन,स्त्रीजीवन व शोषण,सांस्कृतिक संदर्भ,सामाजिकता,मानवी मूल्ये.

**प्रस्तावना**

रॉय किणीकर यांचा आंधळे रंग पांगळ्या रेषा हा कथासंग्रह महत्त्वाचा म्हणून संबोधला जातो. या कथासंग्रहातून सामाजिक जाणीव अत्यंत तीव्रतेने प्रकट झालेली दिसते. जीवनातील मूल्य संघर्ष कथेच्या केंद्रस्थानी असलेला दिसतो. या कथासंग्रहाचा विचार करता या कथासंग्रहामध्ये एकूण बारा कथेंचा समावेश करण्यात आलेला आहे. प्रत्येक कथा अनन्यसाधारण स्वरूपाची आहे. अर्थनिर्णयाच्या पातळीवर कथा अत्यंत मूल्यात्मक भान करताना दिसते. रॉय किणीकर ज्या कालखंडामध्ये कथालेखन करतात त्या कालखंड खऱ्या अर्थाने अनेक चळवळी आकाराला आलेल्या आहेत. हा कालखंड खूप गुंतागुंतीची म्हणून ओळखला जातो. परंतु यांच्या लेखनावर कोणत्याही स्वरूपाचा समकालीन लेखनाचा प्रभाव जाणवत नाही. याची एक महत्त्वाचे कारण असे असू शकते. की तटस्थ राहून लेखन करणे ही रॉय किणीकर याची भूमिका या लेखन व्यवहारामागे असणे अपेक्षित आहे. रॉय किणीकर जे विषय आपल्या कथालेखनातून मांडतात ते अत्यंत तरल स्वरूपाचे असलेले दिसून येतात. त्यांच्या कथेच्या आशयाच्या अनुषंगाने विचार केला. तर आंधळे रंग पांगळ्या रेषा कथासंग्रह अशा विविध कथेतून वेगवेगळ्या क्षेत्रासंदर्भात आलेले अनुभव ते नेमके पद्धतीने मांडताना दिसतात. रॉय किणीकर यांच्या कथालेखनाचा अभ्यास करताना त्यांच्या कथांचे कथानक, आशयसूत्रांचा अभ्यास, कथेतील वेगवेगळ्या पातळीवर आकाराला आलेल्या व्यक्तिरेखांचा अभ्यास, कथेतून आविष्कृत झालेली भाषाशैली, एवढेच नाही तर समकालीन सांस्कृतिक साहित्यव्यवहारात रॉय किणीकर यांच्या साहित्याचे वेगळेपण अधोरेखित करणे. अशा विभिन्न पातळीवर रॉय किणीकर यांच्या कथेची चिकित्सा संशोधनाच्या अनुषंगाने केली जाईल. यातून राजकीय, सामाजिक पर्यावरण कथेतून कोणत्या स्वरूपात आकाराला आले याचे महत्त्व कथेच्या अनुषंगाने अधोरेखित केले जाईल. ज्या कालखंडात रॉय किणीकर लिहितात त्या कालखंडाची काही गुणधर्म व युगशैली त्यांच्या साहित्यात अविस्कृत झाली आहे. का याचाही विचार या अनुषंगाने केला जाईल. अशा विविध पातळीवर चिकित्सा करत असताना. रॉय किणीकर यांनी लिहिलेल्या कथेचीमीमांसा अत्यंत सूक्ष्म पातळीवर केली जाईल. कथेतून येणारी पात्र

भाषाशैली, कथानक, निवेदन पद्धती, वातावरणनिर्मिती याचाही एक अभ्यास या दृष्टिकोनातून समोर येईल. या सर्व घटकांची नोंद या प्रस्तुत प्रकरणांमध्ये घेतली जाईल. आणि कथेचे मूल्यात्मक महत्त्व संशोधनातून मांडले जाईल. अशा चिकित्सेतून साहित्यकृतीची वेगवेगळी अंगे वाचकांच्या समोर येतात. आणि वाचक देखील अशा साहित्यकृतीबद्दल चिंतन करायला लागतो. या अर्थानेच संशोधकीय भूमिका महत्त्वाच्या असतात. त्यातूनच आंधळे रंग पांगळया रेषा या कथासंग्रहातील विविध कथांचा परामर्श घेतला जाईल.

कथानकाची सैद्धांतिक भूमिका समजून घेणे देखील महत्त्वाची आहे. मुख्यतः कथानक म्हणजे काय या अनुषंगाने विचार करताना. घटना आणि पात्रे हे कथानकाच्या महत्त्वाचे घटक म्हणून समोर येतात. ते एकमेकांना घडवीत कथानकाची उभारणी करीत असतात. घटना, प्रसंगाची वेधकगुंफण म्हणजे कथानक असते. सहितेतील शब्दार्थ ज्ञानाच्या आधारे वाचक चिंतनाने गोष्ट जाणून घेत असतो. म्हणजे एक प्रकारे घटना, प्रसंगाच्या आधारे त्या कथेतील कथानक समजून घेत असतो. प्रत्येक घटनेमागे ती घटना घडवण्यासाठी एक व्यक्ती कार्यरत असते. किंवा त्यापेक्षा अनेक व्यक्ती कार्यरत असतात. कारण प्रत्येक घटनाही कुणाच्यातरी संदर्भातच घडत असते. तसेच तिला स्थळ, काळाची चौकट असते. घटनेचे नैसर्गिक घटना, मानवी घटना असे प्रकार देखील आपल्याला या अनुषंगाने उभे करता येतात. घटना या आपोआप घडत नाहीत. किंवा स्वतःहून सांगितल्याही जात नाहीत. घडलेल्या घटनांचे निवेदन करणारा कोणीतरी निवेदक असतो. हा निवेदक आपल्या दृष्टिकोनातून घटनांची गुंफण करतो. त्यातूनच कथानक निर्माण होत असते. कथानक निर्माण होण्यासाठी घटना व पात्रे महत्त्वाची ठरत असतात. एकमेकांवर ती पात्रे प्रभाव टाकीत एकमेकांना घडवीत असतात. ह्या दृष्टीने घटना व पात्रे यांच्यातील परस्पर संबंध देखील प्रस्थापित झालेले असतात. कथेत प्रधान आणि गौण अशा प्रकारच्या दोन घटना असतात. या दोन्ही घटनांच्या अर्थपूर्ण गुंफणीतून कथानक तयार होते. संपूर्ण कथेमध्ये काही मोजक्या व आवश्यक अशा घटना, प्रसंग कथानकाला विशिष्ट प्रकारची दिशा देत असतात. त्या पत्रांच्या व कृतींच्या काहीतरी बदल घडत असतो. त्यामुळे दुसऱ्या नव्या घटना घडतात. प्रधान घटनेने केलेल्या परिवर्तनात गौण घटना पूरक असा अर्थ भरण्याचे काम करत असतात. यातूनच कथानक आकाराला येत असते.

कथानकाची मांडणी करताना अनेक गोष्टी लक्षात घ्याव्या लागतात. लेखक कोणत्याही स्वरूपाचे कथानक आकाराला आणत असताना काही गोष्टीची निवड करत असतो. अर्थातच ही निवड कथानक अधिक सक्षम होण्यासाठी असते. कथाकार मुख्यतः घटना, प्रसंग, व्यक्तिरेखांच्या विविध हालचाली व अशा इतर अनेक तपशीलातून कथेमध्ये समाविष्ट करीत असतो. हेच तपशील म्हणजे कथानक, घटना आणि व्यक्तिरेखा यांचा परस्पर संबंध दर्शवणारे असतात. म्हणजेच कथानकाची निर्मिती करणाऱ्या असतात. एवढेच नाही तर कथानक अधिक गतिमान होण्यासाठी देखील त्या गोष्टी पूरक असतात. व्यक्तिरेखांचे विविध हेतू व निवेदकांचा हेतू अशा दोन्ही प्रकारच्या हेतूतून कथाकार कथेतील घटनांची व तपशिलांची नोंद घेत असतो. एवढेच नाही तर त्या नोंदीतून कथानक सिद्ध करत असतो. कथानकात मुख्यत: काही घटक सामावलेले असतात. त्यामुळेच कथानकाला समग्रता प्राप्त होत असते. कथानकात गुंफल्या जाणाऱ्या घटना बाह्य स्वरूपाच्या असू शकतात. त्याचप्रमाणे त्या मानसिक स्वरूपाच्याही असू शकतात. घटना केवळ काळाच्या क्रमाने सांगितल्या तर ती गोष्ट होते. पण कार्यकारण भाव, संभवनीयता लक्षात घेऊन घटनांच्या क्रमांची गुंफण केली. तर ते कथानक अधिक प्रभावशाली ठरत असते. कार्यकारणभाव व कालतत्व या दोन घटना कथानकाच्या संघटन तत्त्वांमध्ये महत्त्वाच्या ठरत असतात. कधी साहचर्याच्या तत्त्वावर तार्किक पद्धतीने कथानकाची रचना घडत असते. तर कधी कथेतील अनुभवांच्या काव्यात्मक संगतीमुळे कथानकाच्या संघटनेतील तर्कनिष्ठता महत्त्वाची ठरत असते. या दोन्हीही घटकाच्या अनुषंगाने कथानकाची संकल्पना अधिक व्याप्त होत असते. म्हणून कोणत्याही विशिष्ट गोष्टीसाठी कथानक महत्त्वाचे ठरत असते. कथानकाच्या माध्यमातूनच एखादी गोष्ट परिणामकारक पद्धतीने आकाराला आणलेली असते. यातूनच रॉय किणीकर यांच्या कथेचा विचार करायचा झाला तर कार्यकारण संबंधातून त्यांची कथा वाचकावर अधिक प्रभाव प्रस्थापित करताना दिसते. यातूनच त्यांच्या कथा, कथेतील मूल्यात्मक जाणीव प्रकट होताना देखील जाणवते. अशा विविध

पातळीवर रॉय किणीकर यांच्या कथासंग्रहाची मूल्यात्मकता अधोरेखित होते.

आंधळे डोळे या कथेतील आशय नेमक्या स्वरूपात मांडला आहे. त्यातील घटनेतून स्पष्ट होतो. "संध्याकाळी सहलीसाठी म्हणून गोपाळराव बाहेर पडले पण निश्चित आपण कुठे जाणार आहोत याचा त्याचा त्यांनाच भरवसा वाटत नव्हता. कपडे करून वाड्याच्या मोठ्या दरवाजातून ते बाहेर पडले होते. सइसाला आधी वर्दी मिळालेली असल्यामुळे त्यांनी खोगीर चढवून घोडा तयार ठेवला होता. नेहमीच्या रिवाजाप्रमाणे सईस घोड्यापासून धावत धावत यायचा पण,तू नको येऊस, मी एकटाच जाईन, असे आज पहिल्यादाच गोपाळरावांनीत्याला म्हटले होते."१ कथानकाच्या निर्मितीमध्ये लेखकाचा दृष्टिकोन अत्यंत महत्त्वाचा असतो. कथेतील प्रत्येक घटनेमागे व्यक्तिरेखांचे विविध प्रकारचे हेतू दडलेले असतात. आणि याच घटनांमागे लेखकाची जीवनसरणी व मूल्यप्रणाली उभी असते. कथानकातील घटना जशा महत्त्वाच्या असतात. तशाच कथानकातील विविध घटक देखील कथानकाच्या जडणघडणीसाठी महत्त्वाचे ठरत असतात. निवेदन पत्रांची एक जीवनदृष्टी असते. आणि या जीवनदृष्टी व कथा हेतू मागे लेखकाची व्यापक अशा स्वरूपाची भूमिका देखील असते. लेखक हाच एक कलावंत असतो. आणि जीवनात व सभोवती घडणाऱ्या घटना प्रसंगात या सर्व घटनांचा लेखकाच्या मनावर खोल परिणाम होत असतो. त्यामुळे त्यांच्या मनात काही क्रिया प्रतिक्रिया निर्माण होत असतात. अशा क्रिया प्रतिक्रियातून नैतिकतेचा आधार घेत लेखन आकाराला आलेले असते. यातूनच लेखकाचा विशिष्ट दृष्टिकोन कथानकातून समोर येतो. घटना प्रसंगाची निवड करून लेखक एका कथेला आकाराला आणत असतो. त्यांच्या या दृष्टिकोनाच्या जुळणीतूनच कथेला कलात्मक रूप प्राप्त होत असते. म्हणूनच लेखक आणि त्याची भूमिका कथानकाच्या जडणघडणीमध्ये महत्त्वाचा घटक म्हणून समोर येते.

रॉय किणीकर यांच्या आंधळे रंग पांगळ्या रेषा या कथासंग्रहातील आंधळे डोळे या कथेचा संक्षिप्त विचार करता कथानकातील वैविध्य लक्षात येते." गोपाळराव देशमुख यांचा वाडा हा पंचक्रोशीतला एक मानबिंदू होता. पाहुण्यारावळयानी, आप्तनातलगांनी आणि सग्यासोयऱ्यांनी वाडा नेहमी गजबजलेला असे. गोपाळराव भल्या पहाटेला उठत आणि एक प्रहरभर त्यांचे आन्हीक चालायचे. तिरुपतीचा व्यंकटेश हे त्याची कुलदैवत, त्यामुळे वाड्यात स्वच्छता, सोवळेपणा आणि शुद्ध आचरण कसोशीने पाळले जाई."२ या कथानकातून विविध संदर्भ कथेत आविष्कृत झालेले दिसतात. मुख्यत: सांस्कृतिक दृष्ट्या ही कथा महत्त्वाची ठरते. कारण या कथेतला प्रदेश जगण्याच्या जीवन जाणिवा, भौगोलिक घटना, गावपातळीवरच्या विविध संवेदना कथेच्या केंद्रस्थानी ठेवून कथानक रचलेले दिसून येते. ग्राम जीवनातील माणसांचे चित्रण करणारी ही कथा म्हणून अधोरेखित करता येते. मराठवाड्यासारख्या दुर्गम भागात ही कथा आकाराला आलेली दिसते. या कथेच्या केंद्रस्थानी गोपाळराव देशमुख नावाची व्यक्ती त्याच्या भाव विश्वाच्या विविध पैलूंना स्पर्श करत लेखक ही कथा मांडताना दिसतो. मराठवाड्यातील गाव खेड्यांचे चित्र गोपाळराव देशमुख यांच्या जडणघडणीतून आकाराला आलेले दिसते. गोपाळराव देशमुख म्हणजे अत्यंत दिलदार मनमिळाऊ, स्वच्छ निर्मळ, स्वभावाचा सात्विक अंतकरणाचा उदार स्वभावाचा अशा विविध उपाध्यांनी गोपाळराव देशमुख यांच्या व्यक्तिमत्त्वाचा शोध या कथेतून घेता येतो. गोपाळराव देशमुख यांचा वाडा म्हणजे गाव गाड्यातला एक हक्काचे ठिकाण म्हणून त्यांच्या वाड्याची लवचिकता पंचक्रोशी मध्ये असलेली दिसून येते. सतत गोपाळरावांच्या घरी अनेक नातेवाईकांनी वाडा कायम गजबजलेला दिसतो. गोपाळरावांवर धार्मिक संस्कार झाल्यामुळे चालीरीती, प्रथा, परंपरा, धर्मव्यवस्था, धार्मिक गोष्टी हे नित्याचे झालेले दिसतात. या गोष्टी गोपाळराव पालन करतात म्हणजेच गोपाळराव भल्या पहाटे उठून धार्मिक कृत्य करत असत. नंतर वाड्यात स्वच्छता सोहळेपणा आणि शुद्ध आचरण कसोसीने पाळले जाईल. आणि ते संपल्यावर आपल्या मातोश्रीच्या चरणाला वंदन करून मगच इतर कामांना सुरुवात करत. असा त्यांच्यावर धार्मिक संस्कृतीचा पगडा असलेला दिसून येतो. गोपाळरावांच्या मातोश्री देखील अत्यंत धार्मिक प्रवर्तीच्या असलेल्या दिसतात. त्या सतत मंदिरात जाऊन पूजा अर्चा करणे ही गोपाळरावांच्या मातोश्रींची सवय होती. संसारातून त्यांनी जवळजवळ आपले मन काढून घेतले होते. मिळेल तो वेळ नामस्मरण करणे. आणि दैववादी प्रवर्तींना

प्रोत्साहन देणे. व दैवी गोष्टीची साधना करणे. यातच गोपाळरावांच्या मातोश्री सतत वावरताना दिसतात. यातून वाचकाची उत्सुकता अधिक उत्कंठावर्धक होताना दिसते. कथेतून चित्रित झालेला निसर्ग, कथेत वापरली गेलेली भाषा, कथेतील प्रसंग वर्णन, वाचकाला अधिक ऊर्जादायक ठरतात. यातूनच कथानक वाचकांच्या वृत्ती प्रवृत्तीवर प्रभाव आणि परिणाम गाजवत असतात. गोपाळरावांचे आपल्या आईवर व पत्नीवर असणारे प्रेम कथेतून जागोजागी वाचकांना जाणवते. त्याचबरोबर मनावर प्रभुत्व गाजवणाऱ्या स्त्रीचे दर्शन देखील त्यांच्या कथेतून होते. स्त्रीच्या मनाचा सतत घेतलेला ध्यास याचा परिणाम देखील त्यांच्या कथेत अत्यंत सूक्ष्म पद्धतीने जाणवतो. स्त्रियांबद्दल असलेली तळमळ आणि सहानुभूती गोपाळराव कायम व्यक्त करताना दिसतात. अशा विविध आशयसूत्रातून ही कथा व कथानक अधिक सक्षम बनताना दिसते. अर्थात रॉय किणीकर या कथानकाच्या केंद्रस्थानी असून कथानकाला विविध आयाम प्राप्त करून देतात. असे म्हणणे अधिक उचित ठरेल.

रॉय किणीकर यांच्या कथेची कथानक भक्कम असलेले दिसते. विविध गोष्टींची उकल त्यांच्या कथानकातून सहज होताना जाणवते. त्यामुळेच ते कथानक प्रभावशाली ठरते. "काय केले म्हणजे त्यांना आराम पडेल याचा त्या विचार करू लागल्या त्या म्हणाल्या दुधाची घडी ठेवू का डोक्यावर गोपाळराव विवळत म्हणाले दुधाची घरी नको तुझा हात इथे माझ्या डोक्यावर राहू दे गोपिका"३ या कथानकातून विविध पदर कथेचे आकाराला आलेले दिसतात. कथानक हा कथेचा महत्त्वाचा घटक म्हणून साहित्यव्यवहारात विचार केला जातो. कथानका मध्ये केंद्रस्थानी घटना असतात. म्हणजेच घटनांच्या विविध संघटनेतून कथानक आकाराला येत असते. खऱ्या अर्थाने ह्या घटना समाज जीवनातील विविध घटकातून आकाराला आलेल्या असतात. याला अनेक विविध पैलूंचा स्पर्श करत असतात. सामाजिक, मानसिक, भौतिक, राजकीय अशा विविध स्वरूपाने त्या घटना आकाराला आलेले असतात. त्यातूनच कथानकाला विशिष्ट स्वरूपाचे अधिष्ठान प्राप्त होत असते. कोणत्याही साहित्यकृतीत कथानक हे असतेच त्याशिवाय त्या साहित्यकृतीला पुढे जाता येत नाही. आशयसूत्र आणि कथानक यांच्यात संघटनात्मक पातळीवर एक स्वरूप प्राप्त झालेले असते. त्यातूनच कथानकाला विकसित स्वरूप प्राप्त होत असते. विविध घटनांच्या मिश्रणातून संघटन तत्वाच्या आधारे विभागणी करता येते. गोष्ट आणि कथानक यांच्यातील स्वरूप भेद देखील स्पष्ट करता येतात. केवळ कालानुक्रमाच्या तत्त्वावर आधारलेल्या घटनांच्या गुंफणीला गोष्ट म्हणता येईल. तर कालानुक्रम व कार्यकारणभाव, संभवनीयता या तत्त्वानुसार झालेल्या गुंफणीतून कथानक आकाराला येत असते. या अनुषंगाने कथानकाचा विचार करता येतो. आधुनिक कालखंडामध्ये कथनमीमांसा एक महत्त्वाचा घटक म्हणून समोर येताना दिसतो. साहित्यव्यवहाराचा विचार म्हणजेच संरचनेचा विचार काळाच्या दोन प्रकारच्या व्यवस्थेच्या आधारे केलेला दिसतो. कथनात्मक साहित्यात घटनांच्या कालानुक्रमाची नैसर्गिक क्रमवस्था आणि सौंदर्यात्मक क्रमव्यवस्था अशा दोन क्रमव्यवस्था अंतर्भूत असतात. लेखक कथासहित्यात त्या साहित्यकृतीच्या कलात्मक गरजेनुसार आणि आपल्या सौंदर्यदृष्टीनुसार घटनांचे स्थानांतर करून घटनांच्या नैसर्गिक कालक्रमांचे स्वरूप त्या घटनेला प्राप्त करून देत असतो. साहित्यकृतीत गर्भित असलेले घटनांची नैसर्गिक कार्यक्रम अवस्था म्हणजे तिची गोष्ट असते. ही गोष्ट वाचकाने केलेल्या संहितेच्या सर्जनशील वाचन प्रक्रियेत आकाराला येते. साहित्यकृती ती लेखकाने निर्मिलेल्या कालाची नवी सौंदर्यनिष्ठ क्रमव्यवस्था म्हणजे तिची संहिता होय. अशा विविध परिणामांची गुंफण कथेमध्ये आकाराला येत असते. लेखक सातत्याने विचार करत असतो. की कथानकाचा आकार फार मोठा किंवा फार लहान असू नये. त्यांचे घटक आणि त्यांच्या संघटनेतून मूर्त होणारा रूपबंध या संदर्भात संकल्पनात्मक मांडणी झालेली देखील दिसून येते.

रॉय किणीकर यांच्या कथेचे कथानक विविध गुंत्यांना स्पर्श करताना दिसते. हे गुंते समाज जीवनातले व मानवी प्रवृत्तीतले असल्याचे जाणवते. गोपाळरावासारख्या व्यक्तिरेखेच्या माध्यमातून कथा विविध गोष्टींची उकल करताना दिसून येते. यातूनच रॉय किणीकर यांचा दृष्टिकोन कथेच्या अंगाने तपासता येते. "गोपाळरावांचे मन आज खरोखरच वारा प्यालेल्या वासरांसारखे झाले होते. शरीरातल्या नसानसांतून ते मन भर आवेगाने सुसाटत होते. देहाच्या रोमारोमांतून नसानसातून ते मन फुटून बाहेर पडू

पाहत होते. गोपाळरावांच्या मनाच्या हळुवार कुपीत बुच मारून बंद केलेला राक्षस बूच उडल्यागत अक्राळविक्राळ रूप घेऊन गोपाळरावांच्या साऱ्या शरीरभर आक्रमण करू पाहत होता."४ लेखक सातत्याने कथानकामध्ये सेंद्रिय एकात्मता आणण्याचा प्रयत्न करत असतो. त्यातील कोणताही एक घटक वगळला किंवा त्यांचे स्थान बदलले तर संपूर्ण रचनाच बदलत असते. यातूनच कथानकाच्या रूपबंधाला प्राधान्य दिले जाते. यालाच कथानकाच्या संघटनेतील मूलभूत तत्व म्हणून संबोधता येईल. कोणत्याही कलाकृतीच्या घटनांच्या कार्यकारणभाव अभिप्रेत असतो. साहित्यातील अनुभवातील काव्यात्मक संगतीमुळे कथानकाच्या संघटनेतील तर्कनिष्ठतेचे सूत्र अधिक सक्षम होते. म्हणजेच मानवी जीवन हेच नेहमी कलाकृतीच्या भावविश्वाचे केंद्रस्थान असते असे नाही. जेव्हा विविध स्तरावरील मनोव्यापार व संज्ञा यांच्या जोडीने घटना कथेमध्ये आविष्कृत केले जातात. तेव्हा कथानकाची जडणघडण तर्कनिष्ठ स्वरूपाची राहत नाही. तिच्यात अनेक अनपेक्षित तेचे तत्व क्रियाशील होताना दिसते. या सर्व घटनेचा प्रभाव कथानकाच्या जडणघडणीत जाणवायला लागतो. म्हणजेच कथानकात अनेक वेगवेगळया पातळीवरचे प्रयोग देखील संभवत असतात. कथानकातील संघटन तत्वाच्या आधारे कथानकाच्या मूळ संदर्भाने कथेमध्ये अनेक छोटी छोटी उपकथानके देखील अविष्कृत झालेली असतात. या अनुषंगाने देखील कथानकाचा विचार करता येतो. कोणत्याही संहितेच्या केंद्रस्थानी असलेल्या म्हणजेच प्रधान व्यक्तिरेखांच्या जाणीव येथील घटना, प्रसंग, कृती यामधून मुख्य कथानक आकार घेत असते. तर उपकथानक हे दुय्यम व्यक्तिरेखांशी निगडित असते असे स्थूल मानाने म्हणता येईल. उपकथानक आपल्या परीने स्वतंत्र असले तरी ते मुख्य कथानकाच्या संदर्भात आपली भूमिका मांडत असते. मुख्य कथानकाशी उपकथानक जोडलेले असते. त्याच्या जोडीनेच ते आकार घेत असते. उपकथनक मुख्य कथानकासंबंधीचे आपले परिप्रेक्ष अधिक व्यापक करू शकते. साहित्य कृतीतील अनुभवाचा परिपोष अधिक पद्धतीने करू शकते. कथानकाला अधिक अर्थपूर्ण करू शकते. अशा अनेक संदर्भाने उपकथानक देखील महत्त्वाची भूमिका कथानकाच्या अनुषंगाने मांडली जाते. याचाही विचार रॉय किणीकर यांच्या कथेच्या अनुषंगाने मांडणी केली आहे.

कथा या साहित्यप्रकाराच्या अनुषंगाने विचार करताना व सैद्धांतिक मांडणीचा परामर्श घेताना असे लक्षात येते. की कथेच्या अनुषंगाने वेगवेगळया अभ्यासकांनी वेगवेगळी मांडणी केलेली दिसून येते. त्यात काही मांडणीचा परामर्श घेतल्यास कथेच्या संरचने संदर्भात काही घटनांची नोंद घेता येते. या अनुषंगाने विवेचन करताना आनंद वास्कर म्हणतात की, "कथा या वाङ्मयप्रकाराला काही अंगभूत मर्यादा असल्या तरी मराठीतील बहुसंख्य लेखक, लेखिकांनी आपले वाङ्मयीन उद्दिष्ट साधण्यासाठी कथा या साहित्याचा उपयोग केला आहे. माणसांच्या भावभावना आणि त्यांच्या नातेसंबंधातील विविधतेच्या असंख्य छटांचा सखोल शोध हे मराठी वाङ्मयीनव्यवहाराचे एक उद्दिष्ट राहिलेले आहेत. आणि तसे असल्यानेच कथा या साहित्याचा उपयोग मोठ्या प्रमाणावर होतो."५ लेखक कथेच्या अनुषंगाने मानवी जगण्यातील भावभावना व भावभावनातल्या विविध संघर्ष सखोल पद्धतीने साहित्यव्यवहाराच्या केंद्रस्थानी आणतो म्हणजेच यातूनच लेखक कथानक साकारत असतो. अशा विविध प्रश्नांना लेखक कथेच्या माध्यमातून मांडणी करत असतो. ही मांडणी जरी सैद्धांतिक पातळीवरची असली तरी मुख्यतः आशय आणि अभिव्यक्ती या दोन्ही घटकांचा संदर्भ त्यांच्या मांडणीत असतो. यातूनच कथा या साहित्यप्रकाराची जडणघडण आकाराला येत असते. ही जडणघडण संरचनात्मक पातळीवर नुसती शिल्लक राहत नाही. तर त्यातून विविध भावभावना व्यक्त केल्या जातात. कथेचा अवकाश लहान असल्यामुळे लेखक या अवकाशातून अनेक गोष्टी मांडण्याचा प्रयत्न करतो. परंतु या अवकाशाच्याही काही मर्यादा लेखकाला जेव्हा जाणवतात. तेव्हा खऱ्या अर्थाने तो विस्तृत पट असलेला साहित्यप्रकार हाताळण्यासाठी सज्ज होतो. यातून असे स्पष्ट होते की लेखक आपल्या गरजेनुसार साहित्यप्रकाराची निवड करत असतो. ही निवड लेखकाचा आशय व्यक्त करण्यासाठी महत्त्वाची ठरते. नुसता आशय नसतो तर आशयाला अनुषंगुन इतर अनेक घटकांचा समावेश देखील कथनामध्ये होत असतो. म्हणून कथा या साहित्यप्रकाराचा एक पट लेखक सिद्ध करत असताना त्याला त्या साहित्यप्रकारातल्या जमेच्या बाजू माहीत असणे अत्यंत महत्त्वाचे असते. तरच तो खऱ्या अर्थाने

कथेला योग्य न्याय देऊ शकतो. अन्यथा कथा रंजनपर स्वरूपाची होत असते. म्हणून लेखक कथेला वास्तव प्रारूप प्राप्त करून देण्यासाठी अनेक विविध गोष्टी कथेमध्ये सामावत असतो. यातूनच लेखकाची कलात्मकता सिद्ध होत असते.

कोणत्याही साहित्यप्रकाराचा विचार करताना कथन हा साहित्याचा मुख्य गाभा असलेला दिसतो. कथनाशिवाय साहित्याला मूर्त स्वरूप प्राप्त होत नाही. म्हणून कथनाचे योगदान साहित्यव्यवहारात अनन्यसाधारण स्वरूपाचे असते. कथन करणे ही माणसाची प्राचीन सवय असल्यामुळे यातूनच माणसाच्या विविध जगण्याला आकार प्राप्त होत असते. एवढेच नाही तर त्याच्या जगण्यातील आलेल्या अनुभवांना देखील एक रचनाबंद प्राप्त करून दिला जातो. असेही कथनाच्या अनुषंगाने विवेचन करता येते. अनुभव, स्मृती, आविष्कार या खऱ्या अर्थाने कथनाच्या मुख्य व्यवहाराच्या केंद्रस्थानी असतात. कथनाचे विविध रूप मानवी संस्कृतीने निर्माण केलेले दिसतात. यातूनच कथनाला येत गेलेले महत्त्व व साहित्यप्रकारांमध्ये कथन करण्याची संरचना व त्यात झालेला विकास महत्त्वाचा आहे. या अनुषंगाने विवेचन करताना हरिश्चंद्र थोरात म्हणतात की, "कथनात्मक साहित्यकृतीचे वाचन करताना वाचक दोन गोष्टीवर लक्ष केंद्रित करत असतो. आपण वाचन करत असलेली साहित्यकृती कथनात्मक आहे. ही पहिली गोष्ट तर हे कथनरूप एक साहित्यकृती आहे. ही दुसरी गोष्ट या दोन गोष्टी बद्दलच्या संकल्पना या वाचकाच्या हातात असलेली वाचनातल्या प्रवासातली महत्त्वाची साधने असतात. या साधनांचा उपयोग करत वाचक अनेक रीतीने वाचनाचीप्रक्रिया प्रत्यक्षात आणत असतो."६ कथनाच्या माध्यमातून निर्माण झालेली संहिता वाचक वाचत असताना वाचकाला त्या संहितेचा अन्वयार्थ लावावा लागतो. तरच वाचन प्रक्रिया प्रत्यक्षात येत असते. एवढेच नाही तर आपण वाचत असलेली साहित्यकृती कथन रूपाच्या कोणत्या प्रकारात मोडते याची जाणीव असणे देखील वाचकाला कथन ही वाचन प्रक्रियेच्या दृष्टिकोनातून अत्यंत व्यापक आणि सर्वसाधारण स्वरूपाची गोष्ट असल्याचे दिसून येते. त्यामुळेच विशिष्ट साहित्यप्रकारात कोणते कथन वापरले गेलेत याचेही भान वाचकाला त्या संहितेतून आकाराला आलेले असते. एवढेच नाही तर वाचनप्रक्रियेतून त्यासहितेतील विविध घटक वाचकाला लक्षात घ्यावे लागतात. प्रत्येक साहित्यप्रकार वाचण्याची एक विविध स्वरूपाची लकब विकसित झालेली असते. प्रत्येक साहित्यप्रकाराची एक आशय क्षमता देखील विकसित झालेली असते. यातूनच वाचक अधिक सक्षम होत असतो. असेही म्हणता येते. या विविध गोष्टींना अनुसरून विचार केल्यास कथानक ही संकल्पना किती महत्त्वाची आहे. याची प्रचिती विविध अभ्यासकांच्या मांडणीतून स्पष्ट होताना दिसते. ही मांडणी वाचनव्यवहार समृद्ध करण्यासाठी महत्त्वाची ठरते.

स्त्री-पुरुष भेद पारंपरिक समाजव्यवस्थेत पुरुषाचा स्त्री कडे पाहण्याचा दृष्टिकोन गुलामगिरी शोषण इत्यादी पुरुषप्रधान व्यवस्थेतील प्रवर्तिवर मनु व लीला भाष्य करतात. शेवटी मनू म्हणते लीला स्त्री-पुरुषातल्या विरोधाची समस्या सोडवण्यासाठी तुझा माझा जन्म झालेला आहे. ही महान युगप्रवर्तक कार्य करण्यासाठी आपला जन्म झालेला आहे. अशा भावनेतून ते एक दुसरीची समजूत काढताना दिसतात. मनुच्या हातातला विळखा विविध प्रगतीची भेटलेली माणसे दत्तू, मुकुंदा, अच्युत, शंकर बोरगावकर लीलाच्या कानात हे सारेच किंचाळत होते. मनुच्या सावध हालचालीने लीला भानावर आले होती. देहाची झालेली कुचुंबना एक दुसरीच्या सुखदुःखातून अधोरेखित होत होती. या दोघीच्या जीवन प्रवासात जे घडलं होतं. ते इतकं विलक्षण स्वरूपाचं होतं. इतकं असाह्य करणार आहोत. की मानवी समाज जीवनात अशा खूप प्रवृत्तीचा नायनाट करावा. अशा स्वरूपाचं यांच्या वाट्याला आलेले जीवन पुरुषी विळख्यातून बाहेर पडण्यासाठी सातत्याने ह्या झटताना दिसतात. मनुस्मृती या कथेतून या माध्यमातून लेखकाने कलात्मक पद्धतीने स्त्रियांच्या भावजींनातील आविष्कार प्रभावीपणे मांडलेला दिसून येतो. रॉय किणीकर यांच्या मनुस्मृती या कथेत रॉय किणीकरांनी स्त्री जीवनाचे मांडलेली व्यथा ही पारंपरिकतेपेक्षा फारशी वेगळी नाही. आजही या समाजव्यवस्थेत स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन तिला मिळणारी वागणूक काही फारशी वेगळी आहे असे दिसत नाही. यामुळे कथेला दिलेले शीर्षक अत्यंत समर्पक असल्याचे जाणवते. यातूनच रॉय किणीकर यांचा स्त्री कडे पाहण्याचा दृष्टिकोन किती सकारात्मक स्वरूपाचा होता याचाही प्रत्यय या कथेतून अधोरेखित होतो.

**संदर्भग्रंथ:**

1. रॉय किणीकर, आंधळे रंग पांगळया रेषा, डायमंड पब्लिकेशन पुणे, प्रथमावृत्ती १९ पृष्ठ १७
2. किणीकर, आंधळे रंग पांगळया रेषा, डायमंड पब्लिकेशन पुणे, प्रथमावृत्ती १९ पृष्ठ १६
3. रॉय किणीकर, आंधळे रंग पांगळया रेषा, डायमंड पब्लिकेशन पुणे, प्रथमावृत्ती १९ पृष्ठ १९
4. रॉय किणीकर, आंधळे रंग पांगळया रेषा, डायमंड पब्लिकेशन पुणे, प्रथमावृत्ती १९ पृष्ठ १८
5. आनंद वास्कर, वाङ्मयप्रकार संकल्पना व स्वरूप, अन्वय प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती २००४ पृष्ठ ४८
6. थोरात हरिश्चंद्र, कथनात्म साहित्य आणि समीक्षा, शब्द पब्लिकेशन मुंबई, प्रथमावृत्ती २०११ पृष्ठ ९
7. सुधा जोशी, कथा संकल्पना आणि समीक्षा, मौज प्रकाशनगृह मुंबई प्रथमावृत्ती २००० पृष्ठ ५

**डॉ. राजश्री पराग देशपांडे**